भारतीय प्रजासत्ताक दिन चिरायु होवो...
स्थापना १९३९
पुढारी

# लीलावती रुग्णालयात कॅन्सर केअर इन्स्टिट्यूट

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

लीलावती हॉस्पिटल आणि अमेरिकेतील मेयो क्लिनिकसोबत करार करून सुरू केलेले कर्करोग रुग्णालय एक 'आरोग्य मंदिर' आहे. परिचारिका या आमच्या लाडक्या बहिणी असून त्यांना मेयो क्लिनिककडून विशेष प्रशिक्षण दिले जाईल. मला आशा आहे की त्या कौशल्य आणि तंत्रांसह जगातील सर्वोत्तम परिचारिका ठरतील. नर्सिंग कर्मचारी हे आरोग्यसेवेतील अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

लीलावती रुग्णालयाचे नवीन कॅन्सर केअर इन्स्टिट्युटच्या उद्घाटनाप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, कॅन्सर केअर इन्स्टिट्युट कर्करोगाच्या वेळीच आणि अचूक निदानासाठी, रुग्णांच्या प्रकृतीत सुधार आणण्यासाठी आणि मृत्यू दर कमी करण्यासाठी एआय-तंत्रज्ञानाचा वापर करेल. ३०० खाटांच्या या कर्करोग रुग्णालयामुळे कर्करोगग्रस्त रुग्णांची सोय होणार आहे. यावेळी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, वाहतूकमंत्री प्रताप सरनाईक, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, मेयो क्लिनिकचे आंतरराष्ट्रीय आणि एंटरप्राइज ऑटोमेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी बिजू सॅमकुट्टी, लीलावती हॉस्पिटलच्या संस्थापक आणि स्थायी विश्वस्त चारू मेहता, स्थायी विश्वस्त राजेश मेहता, प्रशांत मेहता, राजीव मेहता उपस्थित होते